Description of the place of occurrence (Contd.) :

घटनेच्या जागेचे वर्णन (पुढे चालु) :

सदर गुन्ह्याचे घटनास्थळ हे कांद्री शिवारातील राष्ट्रीय महामार्ग क्र. 7 नागपुर ते जबलपुर जाणाऱ्या रोडवरील अन्नपुर्णा ढाबा ॲण्ड फॅमिली रेस्टॉरेन्ट समोरील सिमेंट रोडचे असुन. सदर राष्ट्रीय महामार्ग चौपदरी असुन दोन्ही बाजुने 30×30 फुटाचे सिमेंट रोड आहे सदर रोड उत्तर-दक्षिण असुन, रोडचे मध्यभागी 10 फुटाचे दुभाजक तयार केल्याचे दिसत आहे दुभाजकावर फुलांची झाडे लावलेली दिसत आहे दुभाजकाच्या पश्चिम दिशेकडे नागपुर कडुन जबलपुर कडे जाणारा सिमेंट रोडवर उत्तर मुखी ट्रक क्र. MH-40-BG-9557 व कोळशाने भरलेला ट्रक उत्तरेकडे तोंड करुन उभा असुन, त्या ट्रकचे मागे टमाटर चे कॅरेट्स लोड भरलेला ट्रक क्र. TN-12-D-7698 चा अपघातग्रस्त स्थितीत रोडचे मध्यभागी उत्तरमुखी उभा असुन, ट्रकचे समोरील कॅबिन संपुर्णपणे तुटफुट होऊन चुरा झाल्याचे दिसत असुन, ट्रकचे इंजिन आतमध्ये घुसल्याचे दिसत आहे. रोडवर ट्रकमधील टमाटर सांडलेले दिसत आहे व टमाटरचे कॅरेट तुटुन पडलेले दिसत आहे. समोरील समोरील ट्रक क्र. MH-40-BG-9557 चे मागील बाजुने डावे बाजुला ट्रक क्र. TN-12-D-7698 चे चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरील ट्रकला मागुन धडक दिल्याने ट्रकचे मागील पल्ला चेपकलेला दिसत आहे. रोडवर गाडीतील ऑईल, काचाचे तुकडे, व धडक मारणारे ट्रकचे कॅबिनचे काही भाग तुटुन पडल्याचे दिसत आहे. अपघातग्रस्त ट्रकचे कॅबीनची पाहणी केली असता, कॅबिनमध्ये दोन इसम जखमी अवस्थेत पडलेले दिसत असुन, त्यातील एक इसमाचे डोके फुटुन जागीच मरण पावल्याचे दिसत आहे. दुसऱ्या जखमी इसमाचे पायाला गंभीर जखम झाल्याची दिसत आहे. क्षतीग्रस्त ट्रकचे समोर चार ते पाच फुट अंतरावर ट्रेलर क्र. MH-40-BG-9557 हा उभा असुन, ट्रेलरवर Goods OFC कॅरियर असे लिहिलेले दिसत आहे ट्रेलरच्या मागील पल्ला चेपकलेला दिसत असुन, दोन फुट आतमध्ये घुसलेला दिसत आहे ट्रेलरचे इंडीकेटर लाईट चालु दिसत असुन, डावीकडील इंडीकेटर लाईट फुटलेला दिसत असुन, ट्रेलरचे मागील चाक बसल्याचे दिसत आहे क्षतीग्रस्त वाहनातील जखमीस स्थानिक लोकांचे मदतीने बाहेर काढुन उपचाराकरिता ॲम्बुलन्सने उपचारा करिता रवाना केले. मरण पावलेला इसम हा ड्रायव्हर सिटचे मागे फसलेला असल्याने क्रेन बोलावुन लोकांचे मदतीने मृतकचे प्रेत बाहेर काढण्यात आले. त्याची पाहणी केली असता, सदर इसमाचा चेहरा, उजवा पाय संपुर्ण फ्रॅक्चर झालेला दिसत असुन डावे पायाचे तळव्याला गंभीर मार लागलेला असुन डोके फुटलेले दिसत आहे. घटनेची परिस्थिती पाहता ट्रेलर क्र. MH-40-BG-9557 हा नागपुर ते जबलपुर रोडने जात असता

Vairagde

किशोरकुमार ज. वैरागडे